# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे,

## ४१२, ई, शिवाजीनगर, पुणे, ४११ ०१६.

**फोन नंबर ५६५६२३४,** **फॅक्स ५६५६२३४**

जा.क्र.विकापु/लेखा-१/अर्थसं अंदाज/२०११-१२/6440 दिनांक : - 9 SEP 2011

**अतिमहत्वाचे**

**कालमर्यादा दि. १६/९/२०११**

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय तंत्रनिकेतने/अभियांत्रिकी महाविद्यालये
औषधनिर्माणशास्त्र व तत्सम संस्था,

विषय :- सन २०१२-२०१३ अर्थसंकल्पीय अंदाज आणि सन २०११-२०१२ सुधारीत अंदाज. (योजनेत्तर) प्रस्ताव पाठविणेबाबत.

संदर्भ :- संचालनालयाचे पत्र क्रमांक १५/अर्थसं/अर्थ/अंदाज/२०११-२०१२/१४५ दिनांक २५/८/२०११

उपरोक्त संदर्भाकिंत पत्राच्या अनुषंगाने कळाविण्यात येते की, सन २०१२-२०१३ चे अर्थसंकल्पीय अंदाज आणि सन २०११-१२ चे सुधारित अंदाज पत्रक संचालनालयाचे पत्राचे अवलोकन करुन विहीत नमुन्यातील प्रपत्रातील सुचनेप्रमाणे (१०५) तंत्रनिकेतने व तत्सम संस्था यांनी **दिनांक १६/९/२०११** पर्यत नचुकता या विभागीय कार्यालयास सदरचे काम पहाणारे संबंधित कर्मचारी यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहुन सदरची माहिती सादर करावी जेणे करुन सर्व संस्थाची एकत्रित माहिती संचालनलायास विहीत मुदतीत सादर करण्यास सुलभ होईल. तसेच (११२) अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील संबंधित अधिकार/कर्मचारी यांनी सदरची माहिती संचालनालयास **दिनांक १९/९/२०११** पर्यत सादर करावी.

वरील प्रमाणे विहीत कालावधीत ज्या संस्थाची माहिती उपलब्ध होणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखांची राहील. तसेच विहीत नमुन्यातील प्रपत्र संचालनालयाच्या संकेतसथळावर पदर्शित करण्यात आलेले आहेत याची नोंद घ्यावी.

(डी.एन.शिंगाडे)
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे १६.

प्रत :- १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, (कार्यासन क्रमांक ९) मुंबई, यांना माहितीसाठी

२. श्री भिलावे, प्रोग्रॉमर, यांना कळविण्यात येते की, सदरपत्रासह सहपत्र कार्यालयाच्या संकेतस्थळावर पदर्शित करावे.

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१ फॅक्स - २६९२१०२

तार-EDUTECH E-Mail :- 1) System@dte.org.in 2) Desk15@dte.org.in internet:- http://www.dte.org.in


**अत्यंत महत्वाचे**
**तातडीचे / कालमर्यादा दि. १९.९.२०११**

क्रमांक : १५/अर्थसं/अर्थ.अंदाज/२०११-२०१२/१४५
दिनांक : २५-०८-२०११

प्रति,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर.

**विषय :- सन २०१२-२०१३ अर्थसंकल्पीय अंदाज आणि सन २०११-२०१२ सुधारीत अंदाज (योजनेत्तर) प्रस्ताव पाठविणेबाबत.**
**मुख्य लेखाशिर्ष २२०३ तंत्रशिक्षण (योजनेतर)**
**०२०२ शिक्षण, क्रिडा, कला व संस्कृती (०२, तंत्रशिक्षण) महसुल जमा**

**संदर्भ :-** १) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. प्रवेश-१००५/(१६३/०५)/तांशि-२, दि. १५.५.२००७
२) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. तंशिसं-१००६/(१९९/०६)/तांशि-२, दि. १९.१.२००८

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, **सन २०१२-२०१३ चे अर्थसंकल्पीय अंदाज** आणि **सन- २०११-२०१२ चे सुधारीत अंदाज** तयार करण्याबाबत शासनाचे निर्देश आहेत. आपल्या कार्यालयाचे व तसेच आपल्या विभागांतर्गत असलेल्या शासकीय तंत्रनिकेतने, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय / औषधनिर्माणशास्त्र व तत्सम संस्थांचा खर्च भागविण्यासाठी शासनाकडून तरतूद उपलब्ध करुन घेण्यासाठी, संस्थांचे अर्थसंकल्पीय अंदाज तयार करतांना दि. १.४.२००४ च्या शासन निर्णय व त्यानंतर वेळावेळी मंजूर झालेल्या पदांप्रमाणे, स्थायी / अस्थायी तसेच वर्गनिहाय पदे जुळवून शासानाने मंजूरी दिलेल्या पदांचाच अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये अंतर्भाव करुन सोबत जोडलेल्या विहित प्रपत्रात सर्व संबंधित संस्थांकडून प्राप्त करुन संकलित करुन सदर माहितीची एक प्रत (संस्थानिहाय) **दि.१९.९.२०११ पर्यंत** या कार्यालयास **संबंधित अधिकारी / कर्मचारी यांनी** प्रत्यक्ष घेऊन उपस्थित रहावे. मात्र येण्यापूर्वी दूरध्वनीवरुन या कार्यासनाशी संपर्क साधून दिनांक व वेळ निश्चित करुन उपस्थित रहावे.

११ व्या पंचवार्षिक योजनेंतर्गत नव्याने सुरु झालेल्या शासकीय तंत्रनिकेतने, शासकीय अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये व तत्सम संस्था यांना दि. ३१.३.२०१२ रोजी पाच वर्ष पूर्ण होणार आहेत अशा संस्थांच्या वेतन व वेतनेतर आवर्ती खर्चाचा समावेश सन २०१२-१३ च्या, **योजनेतर अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात** करण्यात यावा.

तसेच जी महाविद्यालये / तंत्रनिकेतने ११ व्या पंचवार्षिक योजनेपूर्वीच सुरु झालेले आहेत. मात्र त्यात नवीन अभ्यासक्रम वा प्रवेशक्षमतेत बदल वा अन्य कारणामुळे नवीन पदनिर्मिती वार्षिक योजनेअंतर्गत होऊन ज्या पदांचे वेतन योजनांतर्गत तरतूदीअंतर्गत करण्यात येत आहे. अशा पदावरील वेतनाचा खर्चाचा समावेश देखील संबंधित विभागीय कार्यालयांनी / संस्थांनी सन २०१२-१३ च्या योजनेतर अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात करण्यात यावा.

**सही**

( डॉ. सुभाष महाजन )

प्र. संचालक, तंत्रशिक्षण, म.रा., मुंबई

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी -

१) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई ५१

२) लेखा अधिकारी, का.क्र.६, मुख्य कार्यालय, मुंबई

३) कार्यासन अधिकारी, का.क्र. ७, मुख्य कार्यालय, मुंबई यांना कळविण्यांत येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्र विद्यापीठ, लोणेरे जि. रायगड या संस्थेच्या पदवी व पदविका अभ्यासक्रमावर होणारा वेतन व वेतनेतरचा खर्च वेगवेगळया उपलेखाशिर्षाखाली न दर्शविता तो २२०३ ०५२३ या उपलेखाशिर्षाखाली दर्शविण्यात यावा. तसेच **सदर अर्थसंकल्पीय अंदाजात अधिसंख्य पदांचा समावेश करण्यात येऊ नये.**